# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज
## अर्थशास्त्र विभाग,
## आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, बीए भाग ३, सेमिस्टर नंबर ५,
## "नोट्स"
विषय शिक्षक :डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे (८०५५८०८७७२)

**प्रश्न ५ : आंतर विभागीय व आंतरराष्ट्रीय व्यापार यातील भेद विशद करा.**

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था जगातील अन्य देशापासून पूर्णपणे अलग राहू शकत नाही. कोणत्या ना कोणत्या तरी वस्तू अगर सेवांसाठी जगातील इतर देशावर अवलंबून राहावे लागते. आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होण्याची व विकसित होण्याची महत्त्वाचे कारण म्हणजे औद्योगिक क्रांती होय. शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, बँकिंग या सर्व क्षेत्रात तांत्रिक व संघटनात्मक प्रगती होऊन उत्पादनाची प्रचंड प्रमाणात वाढ झाली. बाजारपेठेचा विस्तार होत गेला. सूक्ष्म श्रमविभागणी तत्व देशाप्रमाणे सर्व जगाच्या आर्थिक व्यवहाराचे मूलभूत तत्व बनले. विशेषीकरण आणि परस्परावलंबन हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सूत्र बनले. आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होण्याची प्रमुख कारण म्हणजे निसर्ग होय. कारण निसर्गाने प्रत्येक देशांना वेगवेगळ्या देणग्या बहाल केल्या आहेत. उदाहरणात अरब राष्ट्रांना पेट्रोलचा साठे, झांबिया देशात तांब्याच्या खाणी इत्यादी. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार जगभर विकसित झालेला दिसून येतो. एकविसाव्या शतकातील अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्वाच्या समस्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराने सर्वच राष्ट्रांची प्रगती होईल आणि सर्व देशातील लोकांचे राहणीमान उंचावेल असे प्रतिबंध असे प्रतिपादन करण्यात आले.

**अ.	आंतर विभागीय व्यापार अर्थ:**

१.	“एकाच देशाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये वस्तू आणि सेवांची जी खरेदी-विक्री होते त्यांना आंतर विभागीय किंवा अंतर प्रदेश व्यापार असे म्हणतात.”

२.	“ देशाच्या भौगोलिक सीमांच्या आत होणाऱ्या व्यापाराला अंतर्गत व्यापार असे म्हणतात”.

३.	“ एकाच देशातील दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्यांमध्ये होणाऱ्या व्यापाराला अंतर्गत व्यापार असे म्हणतात”.

उदा भारतातील महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये होणाऱ्या व्यापाराला आंतर विभागीय किंवा अंतर्गत व्यापार असे म्हणतात.

**ब. आंतरराष्ट्रीय व्यापार अर्थ:**

१. “ देशाच्या सीमेपलीकडच्या विविध देशात होणारा व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय.”

२. “ज्या व्यापारात एका देशातील वस्तू दुसऱ्या देशात निर्यात केल्या जातात तसेच ज्या वस्तूचे देशात उत्पादन होत नाही अशा वस्तूंची आयात केली जाते अशा व्यापाराला निर्यात आयात व्यापार असेही म्हणतात”.

३. “दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये घडून येणाऱ्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात”.

४.	“जो व्यापार देशाच्या भौगोलिक सीमेबाहेर चालतो त्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात”.

उदा. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार, भारत आणि इराण या देशातील व्यापार, हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उदाहरण आहेत.

**आंतर विभागीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यातील फरक:**

आंतर विभागीय व्यापार किंवा अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यातील भेद पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. उत्पादन घटकांच्या गतिशीलता फरक
२. नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीत भेद
३. उत्पादन तंत्र आणि भांडवली साधना मधील फरक
४. नियंत्रणे व निर्बंध
५. सुरक्षितता
६. सरकारी धोरण
७. उत्पादन खर्चातील फरक
८. भिन्न बाजारपेठा
९. सार्वभौम राज्यसंस्था
१०.चलन पद्धती
११. वाहतूक खर्चातील भेद
१२. राजकीय प्रणालीतील भेद
१३. आंतरराष्ट्रीय व्यापारात कर विषयक धोरण
१४. चलन विषयक धोरण भिन्नता
१५. आंतराष्ट्रीय रोखता
१६. व्यापारी करार
१७. सामायिक बाजारपेठा

**सारांश :**

आंतर विभागीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यात मूलभूत फरक असल्याने अंतरराष्ट्रीय व्यापारासाठी वेगळ्या सिद्धांताची गरज आहे. सनातन अर्थशास्त्रज्ञ मानीत. आधुनिक अर्थशास्त्रज्ञ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार आणि अंतर्गत व्यापार ह्यात भेद करीत नाहीत. अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, “आंतरराष्ट्रीय व्यापार हा अंतर्गत व्यापाराचा एक भाग आहे” कारण विशेषीकरण हे या दोन्ही व्यापाराचे मूलभूत तत्त्व आहे असे असले तरीही आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्माण होणारी व्यापारतोल, व्यवहारातोल व्यवस्थेबाबत सहकार्य, व्यापारी करार, आंतरराष्ट्रीय रोखता, विनिमय दर, आर्थिक व राजकीय धोरणे, भिन्न आर्थिक व राजकीय धोरणे यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास स्वतंत्रपणे करणे अनिवार्य ठरते.